# जाहिरात क्र. ०१/२०२२

# म. रा. मा. प. महामंडळामध्ये सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या माजी चालकांना करारपद्धतीने नेमणूक देण्याबाबत

म.रा.मा.प. महामंडळातील ३१ विभागांकरिता खालीलप्रमाणे रा.प. महामंडळातील सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त झालेल्या चालकांसाठी करार पद्धतीने चालक पदाची कामगिरी करण्यास जे माजी चालक इच्छुक आहेत, त्याबाबत अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

१) वय ६२ वर्षे पूर्ण होण्यासाठी किमान ०६ महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी शिल्लक पाहिजे.

२) रा.प. सेवाकाळात अत्यंत गंभीर व प्राणांतिक अपघात नसणे. तसेच कर्मचारी हा शिक्षा म्हणून बडतर्फ किंवा सेवामुक्त केलेला नसावा.

३) चालकपदी ठोस मेहनतान्यावर कामगिरी करण्यासाठी चालकाकडे अवजड वाहन चालन परवाना वैध असणे तसेच पी.एस.व्ही. बिल्ला असणे ही आवश्यक आहे.

४) रु. २०,०००/- फक्त (मासिक २६ दिवसांकरिता) म्हणजे दैनिक दर रु. ७६९/- इतका मेहनताना राहील. याशिवाय कोणतेही भत्ते व अन्य लाभ देय राहणार नाही.

५) इच्छुक चालक ते ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले त्या विभागांमध्ये करारपद्धतीवर अर्ज करू शकतील. रा.प. महामंडळास गरज भासल्यास नजीकच्या विभागात नियुक्ती करण्यात येईल. सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०३ दिवसांच्या आत इच्छुक सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त चालकांनी संबंधित विभागात वरील अटी व शर्तींची पूर्तता करून अर्ज सादर करावा.